SAMPLE CONTENT

# मराठी (LL)

# व्याकरण - भाषाभ्यास व उपयोजित लेखन

पाठ्यपुस्तकावर आधारित




सावली म्हात्रे
M.A., D.T.Ed.

हितेश कल्याणकर
BMM-Advertising

अमृत पुलेकर
M.A., B.Ed.


Std. IX
(ENG. MED.)


Target Publications® Pvt. Ltd.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे - ०४ यांच्या
अद्ययावत कृतिपत्रिका आराखड्यावर आधारित.

# मराठी (LL)

# व्याकरण-भाषाभ्यास व उपयोजित लेखन

## इयत्ता नववी

**ठळक वैशिष्ट्ये**

- पाठ्यपुस्तक व इयत्ता दहावीच्या कृतिपत्रिका आराखड्यावर आधारित
- पाठ्यपुस्तकातील व्याकरण-भाषाभ्यास व उपयोजित लेखनावर आधारित सर्व कृती समाविष्ट
- भाषाभ्यास विभागातील सर्व घटकांच्या संकल्पनांचे सुलभ स्पष्टीकरण
- भाषाभ्यास विभागात अंतर्भूत घटकांचा परिपूर्ण सराव
- उत्तरे लिहिण्याकरता पर्याप्त जागा उपलब्ध
- उत्तरांचा पडताळा घेण्याकरता उत्तरसूची समाविष्ट
- उपयोजित लेखनातील सर्व घटकांच्या संकल्पनांचे सविस्तर स्पष्टीकरण अंतर्भूत
- उपयोजित लेखनातील प्रत्येक घटकावर आधारित सोडवलेल्या भरपूर कृती
- उपयोजित लेखनातील प्रत्येक घटकामध्ये सरावासाठी मुबलक कृती समाविष्ट

Sample Content

Printed at: **Repro India Ltd.,** Mumbai

© *Target Publications Pvt. Ltd.*
*No part of this book may be reproduced or transmitted in any form or by any means, C.D. ROM/Audio Video Cassettes or electronic, mechanical including photocopying; recording or by any information storage and retrieval system without permission in writing from the Publisher.*

Balbharati Registration No.: 2018MH0022

**TEID: 2500**

P.O. No. 3958

# प्रस्तावना

इयत्ता ९ वी चे वर्ष हे इयत्ता दहावीच्या दृष्टीने महत्त्वाचे असते. त्यामुळे, सर्वच विषयांच्या परिपूर्ण अभ्यासासाठी सारेच प्रयत्नशील असतात. भाषेतही उत्तम गुण मिळवण्याचा प्रत्येकाचाच प्रयत्न असतो. इयत्ता नववीचा पाठ्यक्रम हा महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांनी इयत्ता दहावीकरता निर्धारित केलेल्या कृतिपत्रिका आराखड्यावर आधारित आहे. यात मराठी विषयातील तब्बल ४० गुण हे व्याकरण, भाषाभ्यास व उपयोजित लेखनाला देण्यात आले आहेत. या घटकांच्या सखोल अभ्यासाने यशप्राप्तीचा मार्ग सुखकर बनवण्याकरता, विद्यार्थ्यांना भाषेवर प्रभुत्व मिळवून दहावीकरता सज्ज करण्याकरता टार्गेट प्रकाशनाचे **मराठी (LL) व्याकरण-भाषाभ्यास व उपयोजित लेखन इयत्ता नववी** हे पुस्तक मुलांच्या, हाती सोपवताना आम्हांला अतिशय आनंद होत आहे.

व्याकरण हा भाषेचा पाया असतो. हा पाया मजबूत असेल, तर भाषेचा सुंदर डोलारा येथे उभा करता येतो. व्याकरण व अनेकविध भाषिक घटकांनी भाषा घडलेली असते. त्यांचा अभ्यास करून भाषेवर प्रभुत्व मिळवणे अधिक सोपे होते. शिवाय, व्याकरण व भाषाभ्यास यांवर आधारित प्रश्नांमध्ये पैकीच्या पैकी गुण मिळवणे सहज शक्य असते; मात्र त्याकरता गरज असते ती व्याकरणिक व भाषिक घटकांमागील मूळ संकल्पना समजून घेऊन त्या घटकांचा पुरेसा सराव करण्याची. विद्यार्थ्यांची हीच गरज लक्षात घेऊन आम्ही या संकल्पना सहज, सोप्या शब्दांत मांडल्या आहेतच. शिवाय, सरावाकरता भरपूर प्रश्न समाविष्ट करून त्यांची उत्तरे लिहिण्याकरताही पुरेशी जागा दिली आहे. या पुस्तकाच्या अभ्यासातून विद्यार्थ्यांची व्याकरण व भाषाभ्यासावरील पकड मजबूत होईल असा आम्हांला विश्वास आहे.

'उपयोजित लेखन' हा भाषेचा सृजनात्मक आविष्कार आहे. यातील प्रत्येक घटकाला स्वत:ची अशी एक शैली आहे. ही लेखनशैली पुरेशा सरावाने विकसित करता येते. यादृष्टीने या पुस्तकात उपयोजित लेखन विभागातील प्रत्येक घटकावर आधारित विपुल नमुना कृती देण्यात आल्या आहेत. त्यांचा अभ्यास करून विद्यार्थ्यांमध्ये कल्पनाशक्ती, सृजनशीलता, विचार अभिव्यक्ती, अनुरूप भाषेचा वापर करण्याची क्षमता इत्यादी गुण वाढीस लागतील.

व्याकरण भाषाभ्यास व उपयोजित लेखनातील प्रश्न सोडवताना काय काळजी घ्यावी, प्रत्येक घटकासाठी शब्दमर्यादा, पाळायच्या व टाळायच्या सर्व बाबी यात नमूद करण्यात आल्या आहेत.

व्याकरण व भाषाभ्यासावर आधारित भरपूर कृती, १५ पत्रे, १२ गद्य आकलन उतारे, २५ कथा, १७ जाहिराती, १० मुलाखती, ५ संवादलेखन, ६ वृत्तांतलेखन, ४५ निबंध एवढा विपुल अभ्यास झाल्यानंतर मुलांना ४० गुणांपैकी जास्तीत जास्त गुण मिळवणे शक्य होईल.

सरावानेच सिद्धी प्राप्त होते असे म्हणतात. हा सराव योग्य दिशेने असावा याकरता हे पुस्तक विद्यार्थ्यांना नक्कीच उपयुक्त ठरेल.

**धन्यवाद!**

**ज्ञानार्थींना मन:पूर्वक शुभेच्छा!**

**प्रकाशक**

**आवृत्ती:** प्रथम

हे पुस्तक परिपूर्ण करण्यासाठी आम्ही सर्वतोपरी प्रयत्न केले आहेत, तरी पुस्तक अधिकाधिक उत्कृष्ट व्हावे, यासाठी आपल्या सूचना स्वागतार्ह आहेत. याकरता आपला अभिप्राय mail@targetpublications.org या इ-मेल पत्त्यावर पाठवावा ही नम्र विनंती.

Sample Content

**Disclaimer**

This reference book is transformative work based on 'मराठी अक्षरभारती; चौथे पुनर्मुद्रण: २०२१' published by the Maharashtra State Bureau of Textbook Production and Curriculum Research, Pune. We the publishers are making this reference book which constitutes as fair use of textual contents which are transformed by adding and elaborating, with a view to simplify the same to enable the students to understand, memorize and reproduce the same in examinations.

This work is purely inspired upon the course work as prescribed by the Maharashtra State Bureau of Textbook Production and Curriculum Research, Pune. Every care has been taken in the publication of this reference book by the Authors while creating the contents. The Authors and the Publishers shall not be responsible for any loss or damages caused to any person on account of errors or omissions which might have crept in or disagreement of any third party on the point of view expressed in the reference book.

© reserved with the Publisher for all the contents created by our Authors.

No copyright is claimed in the textual contents which are presented as part of fair dealing with a view to provide best supplementary study material for the benefit of students.

# अनुक्रमणिका


| क्र. | पाठाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| | **भाषाभ्यास** | |
| • | **व्याकरण** | |
| १. | शब्दजाती | १ |
| २. | सामान्यरूप, सरळरूप, प्रत्यय | ६ |
| ३. | काळ | ११ |
| ४. | वाक्यांचे प्रकार | १७ |
| ५. | समास | २० |
| ६. | अलंकार | २८ |
| ७. | वाक्प्रचार | ३२ |
| • | **भाषिक घटक** | |
| १. | शब्दसंपत्ती | |
| | • समानार्थी शब्द | ४२ |
| | • विरुद्धार्थी शब्द | ४७ |
| | • लिंग | ५२ |
| | • वचन | ५६ |
| | • शब्दसमूह | ६१ |
| | • एका शब्दापासून अनेक शब्द | ६४ |
| २. | लेखननियमांनुसार लेखन | ६६ |
| ३. | विरामचिन्हे | ७३ |
| | व्याकरण व भाषाभ्यास यांवर आधारित कृतिपत्रिका – १ | ७७ |
| | व्याकरण व भाषाभ्यास यांवर आधारित कृतिपत्रिका – २ | ७९ |
| | व्याकरण व भाषाभ्यास यांवर आधारित कृतिपत्रिका – ३ | ८१ |
| | व्याकरण व भाषाभ्यास यांवर आधारित कृतिपत्रिका – ४ | ८३ |
| | उत्तरे | ८५ |
| | **उपयोजित लेखन** | |
| १. | पत्रलेखन | १०५ |
| २. | गद्य आकलन | १२१ |
| ३. | कथालेखन | १२७ |
| ४. | जाहिरातलेखन | १४० |
| ५. | मुलाखत | १५२ |
| ६. | संवादलेखन | १६० |
| ७. | वृत्तांतलेखन | १६५ |
| ८. | लेखनकौशल्य<br>**(प्रसंगलेखन)** | |

| | निबंध | पृष्ठ | | निबंध | पृष्ठ |
|---|---|---|---|---|---|
| १. | कारगिल विजय दिवस | १७० | ४. | अविस्मरणीय वाढदिवस | १७२ |
| २. | चित्रकला प्रदर्शनातील फेरफटका | १७१ | ५. | काव्यानंद - एक अविस्मरणीय प्रसंग | १७३ |
| ३. | मी पाहिलेला अपघात | १७२ | ६. | स्वच्छता अभियान - एक अनुभव | १७३ |



Sample Content

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ७. | अविस्मरणीय संगीत महोत्सव | १७४ | १२. | आठवणीतील सहल | १७७ |
| ८. | मी पाहिलेला किल्ला | १७४ | १३. | माझी सायकल स्वारी | १७७ |
| ९. | मी पाहिलेला महापूर | १७४ | १४. | अनोखे वृक्षारोपण | १७७ |
| १०. | माझी जंगल सफारी | १७४ | १५. | एक अनोखा सोहळा | १७८ |
| ११. | लॉकडाऊन काळातील शहर | १७६ | • | सराव कृती | १७८ |
| | **(आत्मकथन)** | | | | |
| | **निबंध** | **पृष्ठ** | | **निबंध** | **पृष्ठ** |
| १. | महामार्गावरील सूचनाफलकाचे आत्मवृत्त | १८० | ९. | किल्ल्याचे आत्मवृत्त | १८४ |
| २. | कुलुपाचे मनोगत | १८१ | १०. | शेतकऱ्याचे आत्मकथन | १८५ |
| ३. | शाळेतील बाकाचे आत्मवृत्त | १८१ | ११. | पूरग्रस्ताचे मनोगत | १८५ |
| ४. | झाडाचे मनोगत | १८२ | १२. | पुस्तकाचे आत्मवृत्त | १८६ |
| ५. | पक्ष्याचे आत्मवृत्त | १८२ | १३. | मी सफाई कामगार बोलतोय... | १८६ |
| ६. | वाहतूक पोलिसाचे आत्मकथन | १८३ | १४. | मातृभाषेचे आत्मवृत्त | १८७ |
| ७. | बंद पडलेल्या मोबाइलची कैफियत | १८३ | १५. | चंद्राचे आत्मवृत्त | १८७ |
| ८. | उपनगरीय रेल्वेचे आत्मवृत्त | १८४ | • | सराव कृती | १८८ |
| | **(कल्पनाप्रधान)** | | | | |
| | **निबंध** | **पृष्ठ** | | **निबंध** | **पृष्ठ** |
| १. | भ्रमणध्वनी नसते तर...! | १८९ | ९. | मी सैनिक झालो तर... | १९३ |
| २. | मला पंख असते तर... | १८९ | १०. | भाषा नसती तर... | १९३ |
| ३. | मी झाड झालो तर... | १९० | ११. | वीज नसेल तर... | १९४ |
| ४. | पक्षी बोलू लागले तर... | १९० | १२. | मी मुख्याध्यापक झालो तर... | १९४ |
| ५. | इंटरनेट नसेल तर... | १९१ | १३. | नदी बोलू लागली तर... | १९५ |
| ६. | आई संपावर गेली तर... | १९१ | १४. | पेट्रोल संपले तर... | १९५ |
| ७. | मी डॉक्टर झालो तर... | १९२ | १५. | माणूस अमर झाला तर... | १९५ |
| ८. | घर बोलू लागले तर... | १९२ | • | सराव कृती | १९६ |


Sample content

# १ शब्दांच्या जाती

कोणत्याही अर्थपूर्ण वर्णसमूहाला शब्द असे म्हटले जाते. भाषेत 'शब्द' या संकल्पनेला अत्यंत महत्त्वाचे स्थान असते. या शब्दांच्या एकूण आठ जाती आहेत. यांपैकी पहिल्या चार जाती सव्यय असून इतर चार जाती अव्यय आहेत. यांनाच अनुक्रमे विकारी आणि अविकारी असे म्हटले जाते.




## सव्यय (विकारी) शब्द

वाक्यात उपयोगात येताना ज्या शब्दांच्या मूळ रूपात बदल होतो, त्या शब्दांना **सव्यय** किंवा **विकारी शब्द** असे म्हटले जाते.

**उदा.** माणूस – माणसातला, देव – देवाला

नाम, सर्वनाम, विशेषण आणि क्रियापद या सव्यय किंवा विकारी शब्दजाती आहेत. यातील नाम, सर्वनाम व विशेषणात विभक्ती, लिंग, वचन व पुरुष यांनुसार बदल होतात, तर क्रियापदांमध्ये काळ व अर्थ यांच्या प्रत्ययांनुसार बदल होतात.

**नाम:**

एखाद्या व्यक्तीला, वस्तूला, पदार्थाला, स्थळाला जे विशिष्ट नाव दिलेले असते, त्याला **नाम** असे म्हणतात. म्हणजेच, प्रत्यक्षात किंवा कल्पनेने जाणलेल्या वस्तूंना किंवा त्यांच्या गुणधर्मांना जी नावे दिली आहेत, त्यांना व्याकरणामध्ये **नाम** असे म्हटले जाते.

**उदा.** नदी, सिंह, सौरभ, ठाणे, हिमालय, पर्वत, परी... इत्यादी.

**सर्वनाम:**

नामांचा पुनरुच्चार करणे किंवा त्यांचा पुन्हा पुन्हा वापर करणे टाळण्यासाठी नामांच्या जागी जी सव्यये (विकारी शब्द) वापरली जातात, त्यांना **सर्वनाम** असे म्हटले जाते.

**उदा.** मी, ती, तू, हा, ही...इत्यादी.

**विशेषण:**

नामाबद्दल विशेष माहिती सांगून नामाची व्याप्ती मर्यादित करणाऱ्या शब्दाला **विशेषण** असे म्हणतात.

**उदा.** कडू, गोड, हुशार, परोपकारी, चांगला, दोन, शुभ्र... इत्यादी.

**क्रियापद:**

ज्या विकारी शब्दामुळे वाक्यातील क्रिया दर्शवली जाते व त्या वाक्याचा अर्थ पूर्ण होतो, अशा वाक्यातील क्रियावाचक शब्दाला **क्रियापद** असे म्हणतात.

**उदा.** बसतो, करतो, देणे, आहे, पितो, जा, जिंकली, इत्यादी.

## अव्यय (अविकारी) शब्द

वाक्यात उपयोगात येताना ज्या शब्दांच्या मूळ रूपात बदल होत नाही, त्या शब्दांना **अव्यय** किंवा **अविकारी** (बदल न घडणारे) **शब्द** म्हणतात. यामध्ये क्रियाविशेषण, शब्दयोगी, उभयान्वयी व केवलप्रयोगी या अव्ययांचा समावेश होतो.

**उदा.**

**क्रियाविशेषण अव्यय:** काल, तेथे, फार, भरभर, वेगाने इत्यादी.

**शब्दयोगी अव्यय:** साठी, पासून, समोर, जवळ, कडे, इत्यादी.

**उभयान्वयी अव्यय:** आणि, वा, अथवा, म्हणून, की, परंतु, परी, इत्यादी.

**केवलप्रयोगी अव्यय:** अबब!, अहाहा!, वाह!, बापरे!, ओहो!, इत्यादी.

**क्रियाविशेषण अव्यय:**

क्रियापदाची विशेष माहिती सांगून क्रियापदाची व्याप्ती मर्यादित करणाऱ्या शब्दाला **क्रियाविशेषण** असे म्हणतात. क्रियाविशेषण अव्ययांनी क्रियेचे वैशिष्ट्य दाखवले जाते. क्रिया कोठे, केव्हा, कशी, किती वेळा किंवा किती प्रमाणात घडली याविषयी माहिती देणाऱ्या शब्दांनाच **क्रियाविशेषण अव्यये** असे म्हणतात.

**उदा.**
i. घोडा **वेगाने** धावतो.
ii. **भरभर** चालू नकोस.
iii. **काल** शाळेला सुट्टी होती.
iv. देव **सर्वत्र** आहे.
v. रमेश **फार** हट्टी आहे.

Sample Content

**शब्दयोगी अव्यय:**

वाक्यामध्ये जे शब्द स्वतंत्र न येता नामासोबत किंवा सर्वनामासोबत जोडून येतात आणि त्या शब्दांचा इतर दुसऱ्या शब्दाशी असलेला संबंध दाखवला जातो, त्या अव्ययांस **शब्दयोगी अव्यय** असे म्हणतात.

**उदा.** i. तो घरा**जवळ** उभा होता.

ii. आमच्या शाळे**समोर** एक फुलबाग आहे.

iii. रमेश**देखील** माझ्या**सोबत** आला होता.

iv. टेबला**खाली** पुस्तक पडले.

v. सूर्य ढगा**मागे** लपला.

**लक्षात ठेवा**

अनेक क्रियाविशेषणे शब्दयोगी अव्यये म्हणून वापरली जातात. अशा वेळी ती प्रत्ययांप्रमाणे शब्दांना जोडूनच लिहायची असतात. शब्दयोगी अव्यये व क्रियाविशेषण अव्यये यांतील फरक समजून घेण्यासाठी खालील दोन गटांतील वाक्ये वाचूया.

| क्र. | गट - १ | गट - २ |
|---|---|---|
| i. | राम झाडा<u>मागे</u> लपला. | <u>मागे</u> शंकर उभा होता. |
| ii. | मैदाना<u>वर</u> झाडे उगवली. | <u>वर</u> सूर्य तळपत होता. |

वरील दोन्ही गटांमध्ये 'मागे', 'वर' हे शब्द दिसतात. पहिल्या गटात ते शब्दांना जोडून आले आहेत, म्हणून ती शब्दयोगी अव्यये आहेत, तर दुसऱ्या गटात ते शब्द स्वतंत्रपणे आले आहेत व वाक्यातील क्रियापदांविषयी विशेष माहिती देत आहेत, म्हणून ती क्रियाविशेषण अव्यये आहेत.

**उभयान्वयी अव्यये:**

दोन किंवा अधिक शब्द अथवा दोन किंवा अधिक वाक्ये यांना जोडणाऱ्या शब्दाला **उभयान्वयी अव्यये** असे म्हणतात.

**उदा.** i. पाहुणे आले **आणि** लाईट गेली.

ii. आंबा **व** फणस ही कोकणातील फळे आहेत.

iii. त्याने खूप अभ्यास केला; **परंतु** परीक्षेत तो नापास झाला.

iv. गाड्या उशिराने धावत आहेत; **म्हणून** मला जायला उशीर झाला.

v. त्याला यश मिळाले **कारण** त्याने खूप मेहनत केली.

**केवलप्रयोगी अव्यये:**

केवळ प्रयोगासाठी वापरल्या जाणाऱ्या अव्ययांना **केवलप्रयोगी अव्यये** असे म्हणतात. ही अव्यये बोलणाऱ्याच्या मनातील हर्ष, शोक, आश्चर्य, तिरस्कार, अनुमोदन इत्यादी भाव किंवा वृत्ती दर्शवतात.

**उदा.** i. **अय्या!** इकडे कोठे तू?

ii. **आई गं!** खूप लागलंय तुला.

iii. **वा!** किती छान झालंय जेवण!

iv. **अबब!** केवढी उंच इमारत आहे ही!

v. **शाब्बास!** खूप छान काम केलेस तू.

Sample Content

## सराव कृती

**कृ.१. खालील शब्दांतील नामे व विशेषणे ओळखा व त्यांच्या योग्य जोड्या लावा.**

रिकामी गोड ओले
लाल हिरवे
गुलाब रस्ता कागद झाड लाडू
कपडे आकाश बाटली माणसे
पुष्कळ निळे कोरा मोकळा

**उत्तर:** i. ---------- ii. ---------- iii. ----------
iv. ---------- v. ---------- vi. ----------
vii. ---------- viii. ---------- ix. ----------

**कृ.२. खालील सर्वनामे वापरून वाक्ये तयार करा.**

i. मी ----------

ii. आम्ही ----------

iii. आपण ----------

iv. तू - ------------------------------
v. हा - ------------------------------
vi. ते - ------------------------------
vii. तो - ------------------------------
viii. स्वत: - ------------------------------
ix. ती - ------------------------------
x. त्याने - ------------------------------

**कृ.३. खालील वाक्यांत कंसातील योग्य ती विशेषणे भरा.**

(मनमोहक, गमतीदार, सुंदर, छान, पांढरा शुभ्र, धडाकेबाज, मनमोकळा, गुणी, हिरवेगार, लुसलुशीत, नवेकोरे)

i. ---------- हस्ताक्षर हाच खरा दागिना आहे.
ii. सणाच्या दिवशी मी ---------- कपडे घातले.
iii. ---------- झाड पाहून मन प्रसन्न झाले.
iv. बाईंनी आम्हांला ---------- कोडे सोडवायला दिले.
v. हा ससा ---------- आहे.
vi. तो स्वभावाने ---------- होता.
vii. ते गवत खूप ---------- आहे.
viii. रमेश ---------- मुलगा आहे.
ix. ती ---------- मूर्ती आम्ही पाहतच राहिलो.
x. वर्गात बाईंनी आम्हांला ---------- गोष्ट सांगितली.

**कृ.४. खालील वाक्यांत कंसातील क्रियापदाचे योग्य ते रूप घालून वाक्य पूर्ण करा.**

i. राघवला नाचता ---------- (येणे)
ii. समीरने झाडावरच्या कैऱ्या ---------- (पाडणे)
iii. त्याने चादर ---------- (अंथरणे)
iv. विद्यार्थी कार्यक्रमात शास्त्रीय गाणे ---------- (गातो)
v. रोहन, तळ्यातील फुले ---------- (बघणे)
vi. मला मिठाई फार ---------- (आवडणे)
vii. तो उद्या सकाळी गावाला ---------- (जाणे)
viii. त्याने जेवण ---------- (करणे)
ix. ती वस्तू इथे ---------- (आणणे)
x. थोड्याच वेळात त्याचा अभ्यास पूर्ण ---------- (होणे)

**कृ.५. खालील वाक्यांतील नाम, सर्वनाम, विशेषण, क्रियापद ओळखून त्यांचे वर्गीकरण करा.**

i. अनन्याचे निळे डोळे मला फार आवडतात.
ii. राघव आणि राम सुंदर गाणी गातात.
iii. वरुण आपण अभ्यास करूया.
iv. पुरणपोळीचा खमंग वास येतोय.
v. बाबांनी ताजी फळे बाजारातून आणली.
vi. समीर गाडी बघ.
vii. आपण बाहेर जाऊयात.
viii. विनोद, विक्रम, सिद्धांत माझे मित्र आहेत.
ix. पक्षी आकाशात उडाले.
x. बाईंनी मोहनला वही दिली.

**उत्तर:**

| क्र. | नाम | सर्वनाम | विशेषण | क्रियापद |
|---|---|---|---|---|
| i. | ---------- | ---------- | ---------- | ---------- |
| ii. | ---------- | ---------- | ---------- | ---------- |
| iii. | ---------- | ---------- | ---------- | ---------- |

Sample Content

| | | | | |
|---|---|---|---|---|
| iv. | | | | |
| v. | | | | |
| vi. | | | | |
| vii. | | | | |
| viii. | | | | |
| ix. | | | | |
| x. | | | | |

**कृ.६. खालील वाक्यांतील क्रियाविशेषण अव्यये शोधून लिहा.**

i. वारंवार घरात पाणी भरत होते. - ____

ii. गाडी वेगाने जात होती. - ____

iii. राम पाणी गटागटा प्यायला. - ____

iv. बाळ खुदकन हसले. - ____

v. सदासर्वदा योग तुझा घडावा. - ____

vi. टपटप पावसाची बरसात झाली. - ____

vii. तो गटागटा चहा प्यायला. - ____

viii. देव सर्वत्र आहे. - ____

ix. तो आज गावावरून आला. - ____

x. राहुलने घाईघाईने काम आवरले. - ____

**कृ.७. कंसातील शब्दयोगी अव्ययांचा वापर करून वाक्य बनवा.**

(वर, समोर, पेक्षा, मुळे, साठी, जवळ, ऐवजी, विरुद्ध, पाशी, जागी)

i. ____

ii. ____

iii. ____

iv. ____

v. ____

vi. ____

vii. ____

viii. ____

ix. ____

x. ____

**कृ.८. खालील वाक्यांतील अधोरेखित शब्दाची जात ओळखा.**

i. तो <u>पूर्वी</u> गात होता. - ____

ii. संभाषणा<u>पूर्वी</u> तो सदैव तयार असे. - ____



Sample Content

iii. गावची यात्रा जवळच होती. - ..........................

iv. घराजवळ मंदिर होते. - ..........................

v. राजला जेवणानंतर आईसक्रीम हवे होते. - ..........................

vi. आपण नंतर खाऊ. - ..........................

vii. मागे राज उभा होता. - ..........................

viii. मी झाडामागे गेलो. - ..........................

*ix. आजी, कुठं चाललीस? - ..........................

**कृ.९. खालील वाक्यांतील उभयान्वयी अव्यये अधोरेखित करा.**

i. चंदू आणि अमृत दररोज सकाळी व्यायामशाळेत जातात.
ii. चित्रपट नेहमी वेळेत सुरू होतो; परंतु वीज गेल्यामुळे आज थोडा उशीर झाला.
iii. तुम्ही उशिरा उठा, तरीही सूर्य दररोज वेळेतच उगवतो.
iv. सकाळी चालण्याने शरीर तंदुरुस्त राहते शिवाय मनही प्रसन्न राहते.
v. पावसाने अंधार केला अन् विजा कडाडू लागल्या.
vi. तो आज किंवा उद्या येईल.
vii. चिमणीने घरट्याबाहेर मान काढली व किलबिलाट केला.
viii. लग्न छान झाले; पण जेवण बरोबर नव्हते.
ix. चांगले उपचार मिळावेत, यास्तव तो मुंबईला गेला.
x. तो आला नाही कारण त्याला बरे वाटत नव्हते.

**कृ.१०.रिकाम्या जागी कंसातील केवलप्रयोगी अव्ययांचा वापर करा.**

(छे, अबब, अरेरे, बापरे, शी, चूप, शाबास, अय्या)

i. .................... काय हा अवतार तुझा!
ii. .................... केवढे मोठे घर!
iii. .................... एक शब्दही बोलू नकोस.
iv. .................... मला काही हे पटले नाही.
v. .................... खूप छान रंगरंगोटी केलीस.
vi. .................... केवढा भयंकर अपघात होता.
vii. .................... फार वाईट झाले.
viii. .................... किती छान!

**कृ.११.सहसंबंध शोधा.**

i. आणि : उभयान्वयी अव्यय :: वर : ....................
ii. वा! : केवलप्रयोगी अव्यय :: भरभर : ....................
*iii. रमेश : नाम :: ते : ....................
iv. सुंदर : विशेषण :: होता : ....................
v. पुन्हापुन्हा : क्रियाविशेषण अव्यय :: अथवा : ....................

Sample Content


# उपयोजित लेखन

# १ पत्रलेखन

आपल्या मनातील विचार किंवा भावना चांगल्या शब्दांत मांडून दुसऱ्यांपर्यंत पोहोचवण्याचे पत्रलेखन हे एक उत्तम लिखित साधन आहे. आजचे युग हे भ्रमणध्वनी, इंटरनेट, संगणक किंवा इ-मेल यांचे युग आहे. त्यामुळे, पत्रलेखनाची गरज फारशी उरली नाही.

पत्रलेखन ही एक कला असून नव्या तंत्रज्ञानाचा वापर करून पत्रलेखन करणे ही काळाची गरज आहे. हे कसब विद्यार्थ्यांनी नव्या युगाच्या नव्या तंत्रानुसार आत्मसात करावे हा या अभ्यासघटकाचा उद्देश आहे. यासाठी इ-मेल पाठवण्याच्या पद्धतीनुसार पत्रलेखनाचे प्रारूप देण्यात आले आहे.

पत्रलेखनाचे दोन प्रमुख प्रकार आहेत. औपचारिक पत्र व अनौपचारिक पत्र




इयत्ता नववीच्या अभ्यासक्रमात स्वपरिचय, मागणी, तक्रार या औपचारिक पत्रप्रकारांचा अभ्यास आपण करणार आहोत. इयत्ता दहावीच्या तयारीकरता अभिनंदन पत्र या अनौपचारिक पत्राचाही अभ्यास आपण करणार आहोत. स्वपरिचय पत्र हे कृतिपत्रिकेतील लेखन विभागात समाविष्ट नाही; मात्र विद्यार्थ्यांसाठी हा प्रकार उपयुक्त असल्याने, त्याचा अभ्यास करावा. कृतिपत्रिकेत एखादी सूचना, आवाहन, निवेदन, जाहिरात, विषय इत्यादी प्रकारांपैकी एक कृती दिलेली असते. ती कृती, विषय समजून घेऊन विद्यार्थ्यांनी पत्रलेखन करायचे आहे.

## पत्रात समाविष्ट असलेल्या बाबी

| क्र. | औपचारिक पत्र | अनौपचारिक पत्र |
|---|---|---|
| १. | पत्राच्या वरच्या डाव्या कोपऱ्यात दिनांक लिहावा. | पत्राच्या वरच्या डाव्या कोपऱ्यात दिनांक लिहावा. |
| २. | प्रति, लिहून संबंधित व्यक्तीचा समर्पक हुद्दा नमूद करावा.<br>उदाहरणार्थ: मुख्याध्यापक, प्राचार्य, क्रीडाधिकारी, सचिव, अध्यक्ष, व्यवस्थापक, संचालक, कार्यकारी संचालक, मुख्य कार्यकारी अधिकारी, शिक्षणाधिकारी, कार्यकारी अभियंता इत्यादी. | व्यक्तीचा नात्याप्रमाणे व सन्मानपूर्वक योग्य उल्लेख करावा.<br>उदाहरणार्थ:<br>**नाते** — **मायना** — **अभिवादन**<br>आई/ वडील – तीर्थरूप } साष्टांग नमस्कार<br>काका/ काकू इत्यादी – तीर्थस्वरूप }<br>भावंडं – प्रिय — शुभाशीर्वाद |
| ३. | पत्राचा विषय थोडक्यात लिहावा. | अनौपचारिक पत्राचा विषय लिहिण्याची गरज नसते. |
| ४. | पत्राचा आशय मोजक्या व अचूक शब्दांत मांडावा. | व्यक्तीचे कुशल विचारावे, भावना व्यक्त करणाऱ्या, जिव्हाळा दर्शवणाऱ्या भाषेचा वापर करावा. लेखन विस्तृत करावे. |
| ५. | शेवटी डावीकडे आपला विश्वासू, आपला कृपाभिलाषी इत्यादी शब्द लिहून खाली पत्र पाठवणाऱ्याचे नाव, पत्ता व इ-मेल आयडी टाकावा. | पत्राचा समारोप करताना डावीकडे योग्य मायना वापरावा व त्याखाली पत्र पाठवणाऱ्याचे नाव, पत्ता व इ-मेल आयडी टाकावा. |

**[टीप:** पत्राला उत्तर मिळणे आवश्यक असल्याने पत्र पाठवणाऱ्याचा पत्ता लिहावा लागतो. सर्व पत्रांची मांडणी इ-पत्रानुसार डाव्या बाजूस लिहिणे अपेक्षित आहे. पाकीट काढून पत्ता लिहिण्याची आता आवश्यकता भासत नाही. (इ-मेल लिहिताना पाकीट काढण्याची आवश्यकता नसते.)**]**

Sample Content

## पत्राचे प्रारूप

दिनांक ________

प्रति, ________

माननीय ________
________

विषय: ________

महोदय/महोदया,

________

मुख्य मजकूर

आपला / आपली,

____________

पत्ता (पत्र पाठवणाऱ्याचा पत्ता)

________________
________________

(इ-मेल आयडी)

### लक्षात ठेवा

१. प्रश्न काळजीपूर्वक वाचून विषय समजून घ्या.

२. निवडलेल्या विकल्पानुसार पत्राचे योग्य प्रारूप व भाषा वापरा.

३. कृतिपत्रिकेत पत्र ज्याला पाठवायचे आहे (प्रति) व पत्र पाठवणारा (प्रेषक) यांचे नाव दिलेले असेल, तर तेच नाव पत्रात वापरा. नाव दिलेले नसल्यास अ. ब. क. वगैरे नाव लिहू शकता.

४. कृतिपत्रिकेत दिलेले पत्तेच पत्रलेखनात वापरा. पत्ते दिलेले नसल्यास काल्पनिक पत्ते लिहा.

५. योग्य प्रारूपात पत्र लिहिण्याचा सराव करा.

स्वपरिचय पत्र म्हणजे स्वत:बद्दलची थोडक्यात माहिती असते. ती संक्षिप्त; पण प्रभावी स्वरूपात असल्यास आपल्या निवडीची शक्यता वाढते. स्वपरिचय पत्राची मांडणी अशी करावी.

१. स्वपरिचय पत्र लिहिताना सुरुवातीला आपले पूर्ण नाव, पत्ता, संपर्क क्रमांक, इ-मेल व जन्मतारीख इत्यादी तपशील लिहावेत.

२. त्यानंतर तपशीलवार आपली शैक्षणिक पात्रता लिहावी. तसेच, काही विशेष प्रशिक्षण घेतले असल्यास तेही नमूद करावे.

३. आपले छंदही लिहावेत. यामुळे, व्यक्तिमत्त्व समजण्यास मदत होते.

४. यानंतर आजवर तुम्हांला असलेला प्रशिक्षणाचा, कामाचा अनुभव विस्तृतपणे लिहावा व पारितोषिके प्राप्त असल्यास त्यांचाही आवर्जून उल्लेख करावा.

५. इतर कलांमध्ये प्रावीण्य मिळवलेले असल्यास तेही नमूद करावे.
अशाप्रकारे, वरील मुद्द्यांची व्यवस्थित मांडणी केल्यास स्वपरिचय पत्र प्रभावीपणे लिहिता येऊ शकते.

**[टीप: स्वपरिचयपत्रातील सर्व माहिती विषयानुरूप; परंतु काल्पनिक असावी.]**



Sample Content

## नमुना कृती

***१** **खालील निवेदन वाचा व संबंधित विषयासाठी स्वपरिचय पत्र तयार करा.**

महात्मा फुले विद्यालय बुलढाणा
आंतरशालेय नाट्यमहोत्सवातील स्पर्धांसाठी

**एकपात्री प्रयोग कलाकारांची निवड**

अंतिम दिनांक
दि. २६ डिसेंबर

इच्छुक विद्यार्थ्यांकडून स्वपरिचय पत्र
मागवण्यात येत आहे.

नाट्यविभाग प्रमुख

**पासपोर्ट आकाराचा फोटो आवश्यक**

स्वपरिचय पत्राचे मुद्दे

| | | | |
|---|---|---|---|
| १) | संपूर्ण नाव | ५) | शैक्षणिक पात्रता / विशेष प्रशिक्षण |
| २) | पत्ता | ६) | छंद |
| ३) | संपर्क क्रमांक | ७) | अनुभव / पारितोषिके |
| ४) | जन्मतारीख | ८) | इतर कलांमधील प्रावीण्य |

**उत्तर:**

दिनांक: १९ डिसेंबर, २०२१

प्रति,
श्री. अ. ब. क.
मा. नाट्यविभाग प्रमुख,
महात्मा फुले विद्यालय,
बुलढाणा - xxxxxx

**विषय:** एकपात्री प्रयोग कलाकारांच्या निवडीबाबत.

महोदय,
मी अलंकार जोशी, इयत्ता ९ वीचा विद्यार्थी असून आंतरशालेय नाट्यमहोत्सवातील स्पर्धांसाठीच्या एकपात्री प्रयोग कलाकारांच्या निवडीची सूचना मी वाचली. या स्पर्धेत सहभागी होण्याची माझी इच्छा आहे. म्हणून, हा अर्ज मी आपणांस सादर करत आहे.

सोबत स्वपरिचय पत्र व पासपोर्ट आकाराचा फोटो जोडला आहे.

आपला विश्वासू,
कु. अलंकार जोशी
१२१, सदानंद अपार्टमेंट,
ता. मलकापूर, जि. बुलढाणा - xxxxxx
alankarjoshi@gmail.com

Sample Content

**स्वपरिचय पत्र**

**वैयक्तिक माहिती:**

**नाव** : अलंकार श्रीकृष्ण जोशी.
**पत्ता** : १२१, सदानंद अपार्टमेंट, ता. मलकापूर, जि. बुलढाणा xxxxxx

**संपर्क क्रमांक**: xxxxxxxxxx
**इ-मेल** : alankarjoshi@gmail.com
**जन्मतारीख** : १४ जून, २००७

**शैक्षणिक पात्रता/ विशेष प्रशिक्षण:**

१. इयत्ता ८ वी उत्तीर्ण (८०%). इयत्ता नववीत शिक्षण घेत आहे.
२. गेली २ वर्षे ‘अभिनय’ या नाट्यप्रशिक्षण संस्थेत नाट्यविषयक प्रशिक्षण घेत आहे.
३. ‘कलारंग’ या संस्थेच्या विविध कार्यशाळांत सहभाग.

**छंद:** चित्रकला, गायन, नृत्यकला, अभिनय, वाचन.
**अनुभव:** १. आंतरशालेय नाट्यस्पर्धेत सहभाग व उत्कृष्ट सहकलाकाराचे पारितोषिक प्राप्त.
२. नाट्य प्रशिक्षण संस्थेतर्फे सलग दोन वर्षे एकपात्री प्रयोगात सहभाग व मागील वर्षी प्रथम पारितोषिक.

**इतर कलांमधील प्रावीण्य:**

१. अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालयाची शास्त्रीय गायन ‘प्रवेशिका प्रथम’ परीक्षा उत्तीर्ण.
२. आंतरशालेय वक्तृत्व स्पर्धेत तृतीय पारितोषिक प्राप्त.
३. ‘काव्यगायन: २०२०’ स्पर्धेत प्रथम पारितोषिक प्राप्त.

*२ **सूचनेनुसार पत्रलेखन करा.**

**सर्व नागरिकांना निमंत्रण**

अमरावतीकरांना सुवर्णसंधी
‘सरगम’ संस्था अमरावतीद्वारे आयोजित
**‘दिवाळी पहाट’**
स्थळ – वसंतराव देशपांडे हॉल
कौस्तुभ व सोनाली माडे यांच्या सुरेल, बहारदार गायनाचा कार्यक्रम

**सर्वांनी सहभागी व्हा**

सोमवार दिनांक २ नोव्हें.

तृप्त करा कानांना
प्रफुल्लित करा मनाला

घरपोच तिकिटांची सोय व हॉलवर विक्री सुरू.

पहाटे ५.३० वाजता

**कार्यक्रमाची तिकिटे संपल्यामुळे हाच कार्यक्रम पुन्हा सादर करण्याची मागणी करणारे पत्र लिहा.** ← **रसिक नागरिक या नात्याने** → **घरपोच तिकिटे मागितल्याप्रमाणे न मिळाल्याबाबत संबंधित व्यक्तीकडे तक्रार करा.**

Sample Content

१. **मागणी पत्र**

दिनांक: ३ नोव्हेंबर, २०२१

प्रति,
माननीय आयोजक,
'सरगम' संस्था,
बाळकराम रोड, रामदास नगर,
अमरावती - xxxxxx

**विषय:** 'दिवाळी पहाट' कार्यक्रम पुन्हा सादर करण्याबाबत.

महोदय,
काल दिवाळी पहाट निमित्त आपल्या संस्थेद्वारे सादर केलेला बहारदार गायनाचा कार्यक्रम पाहण्याची, ऐकण्याची आमची खूप इच्छा होती. आपल्या कार्यक्रमाची तिकिटे घेण्यासाठी वसंतराव देशपांडे हॉल येथे संपर्क साधला असता तिकिटे संपल्याचे समजले. माझ्यासारखेच इतर रसिक प्रेक्षकही तिकिटे न मिळाल्यामुळे नाराज झालेले दिसत होते. आपल्या कार्यक्रमाबद्दल खूप ऐकले आहे आणि तो अनुभवण्याची आमची खूप इच्छा आहे. अमरावतीतील रसिक श्रोत्यांच्या वतीने मी विनंती करतो, की आपण हा कार्यक्रम पुन्हा एकदा सादर करून आम्हांला त्याचा आस्वाद घ्यायची संधी द्यावी. या मागणीचा आपण अवश्य विचार कराल, याची खात्री वाटते.

आपला विश्वासू,
अ. ब. क.
२०४, सन्मान नगर सोसायटी,
अमरावती, xxxxxx
abc@xyz.com

**किंवा**

२. **तक्रार पत्र**

दिनांक: ३ नोव्हेंबर, २०२१

प्रति,
माननीय आयोजक,
'सरगम' संस्था,
बाळकराम रोड, रामदास नगर,
अमरावती - xxxxxx

**विषय:** 'दिवाळी पहाट' कार्यक्रमासाठी घरपोच मागवलेल्या तिकिटांबाबत.

महोदय,
आपल्या संस्थेने वसंतराव देशपांडे हॉल येथे आयोजित केलेल्या 'दिवाळी पहाट' या कार्यक्रमाची दि. २ नोव्हेंबरची १० तिकिटे मी घरपोच मागवली होती. याचे पूर्ण पैसे मी भरले आहेत; मात्र काल कार्यक्रम झाला आणि आम्हांला तिकिटे न मिळाल्यामुळे आम्ही त्या कार्यक्रमाचा आस्वाद घेऊ शकलो नाही. रसिक श्रोत्यांच्या मागणीकडे अशाप्रकारे दुर्लक्ष करणे किंवा याबाबत निष्काळजीपणा करणे ही संतापजनक बाब आहे.

आपणांस नम्र विनंती आहे, की एका बहारदार कार्यक्रमाचे साक्षीदार होण्याची आमची इच्छा पूर्ण करावी आणि त्यादृष्टीने पुढील प्रयोगाची तिकिटे घरपोच पाठवण्याची व्यवस्था करावी. आपण योग्य ती कार्यवाही कराल अशी आशा आहे.

Sample Content

आपला विश्वासू,
अ. ब. क.
२०४, सन्मान नगर सोसायटी,
अमरावती - xxxxxx
abc@xyz.com

**३ पुढील निवेदन वाचा व सूचनेनुसार कृती करा.**

**तेंडुलकर स्पोर्टस्**

दातार कॉलनी, पनवेल

सर्व प्रकारच्या खेळांचे साहित्य मिळण्याचे एकमेव ठिकाण

दुकानाची वेळ
स. १० ते रा. ८

**शाळांसाठी विशेष सवलत**

**सोमवारी बंद**

tendulkarsports@gmail.com

व्यवस्थापक

श्रेयस / श्रेयसी पाटील
ज्ञानसाधना विद्यालय, पनवेल
विद्यार्थी प्रतिनिधी या नात्याने

**शाळेसाठी क्रीडासाहित्याची मागणी करणारे पत्र लिहा.**

**किंवा**

**पाठवलेले क्रीडासाहित्य निकृष्ट दर्जाचे असल्याची तक्रार करणारे पत्र लिहा.**

**उत्तर:**

**१. मागणी पत्र**

दिनांक: २ सप्टेंबर, २०२१

प्रति,
माननीय व्यवस्थापक,
तेंडुलकर स्पोर्टस्,
दातार कॉलनी,
पनवेल - xxxxxx

**विषय:** शाळेसाठी क्रीडासाहित्याची मागणी करण्याबाबत.

महोदय,

मी श्रेयस पाटील, ज्ञानसाधना विद्यालयाचा विद्यार्थी प्रतिनिधी या नात्याने मुख्याध्यापकांच्या अनुमतीने आपणांस हे पत्र लिहीत आहे. आपण शाळेसाठी विशेष सवलतीच्या दरात क्रीडासाहित्य पुरवता हे समजले. आमच्या शाळेसाठी पुढीलप्रमाणे क्रीडासाहित्याची आवश्यकता आहे.

Sample Content

क्रीडासाहित्याची यादी:

| साहित्य | नग |
|---|---|
| क्रिकेट बॅट | ४ |
| फुटबॉल | ४ |
| क्रिकेट बॉल | १० |

| साहित्य | नग |
|---|---|
| हेल्मेट | २ |
| व्हॉलीबॉल | ४ |

आपण लवकरात लवकर वरील साहित्य शाळेच्या पत्त्यावर पाठवण्याची कृपा करावी. सोबत बिल जोडावे जेणेकरून आपणांस त्या रकमेचा धनादेश पाठवता येईल. या साहित्यावर योग्य ती सवलत आपण द्याल याची खात्री आहे.

कळावे,

आपला विश्वासू,
श्रेयस पाटील.
विद्यार्थी प्रतिनिधी
ज्ञानसाधना विद्यालय,
पनवेल - xxxxxx
abc@gmail.com

**किंवा**

**२. तक्रार पत्र**

दिनांक: १२ सप्टेंबर, २०२१

प्रति,
माननीय व्यवस्थापक,
तेंडुलकर स्पोर्टस्,
दातार कॉलनी,
पनवेल - xxxxxx

**विषय:** निकृष्ट दर्जाचे क्रीडासाहित्य पुरवल्याबाबत.

महोदय,
मी श्रेयसी पाटील, ज्ञानसाधना विद्यालयाची विद्यार्थी प्रतिनिधी या नात्याने मा. मुख्याध्यापकांच्या अनुमतीने आपणांस हे पत्र लिहीत आहे. मागच्या आठवड्यात आम्ही आपल्याकडून शाळेसाठी काही क्रीडासाहित्य मागवले होते. आपण शाळांसाठी विशेष सवलत देता हे वाचून आम्ही आपल्याकडून साहित्य खरेदी केले; मात्र आपण पुरवलेल्या साहित्यापैकी काही वस्तू निकृष्ट दर्जाच्या असल्याचे आढळून आले आहे. आपण हे साहित्य त्वरित बदलून देण्याची व्यवस्था करावी. निकृष्ट दर्जाच्या साहित्यामध्ये क्रिकेट बॅट व फुटबॉल यांचा समावेश आहे.

आपण योग्य ती कार्यवाही करून आम्हांला सहकार्य करावे.

कळावे,

आपली विश्वासू,
श्रेयसी पाटील.
विद्यार्थी प्रतिनिधी
ज्ञानसाधना विद्यालय,
पनवेल - xxxxxx
abc@gmail.com

Sample Content

**४** **पुढील जाहिरात वाचा व सूचनेनुसार कृती करा.**

मोठ्या मागणीवर
१०% सूट

**सरस्वती शालेय वस्तुभांडार**
शाळेतील विद्यार्थ्यांसाठी, कार्यालयासाठी
उपयोगी वस्तू रास्त भावात मिळतील.
आजच खरेदी करा.
पत्ता: किसन नगर क्रमांक १, ठाणे (प.)
sarasvati@gmail.com

विद्यार्थी प्रतिनिधी या नात्याने

| | | |
|---|---|---|
| **शालेय वस्तूंची मागणी करणारे पत्र लिहा.** | **किंवा** | **मागवलेल्या वस्तू कमी आल्याची तक्रार करणारे पत्र लिहा.** |

**उत्तर:**

१. **मागणी पत्र**

दिनांक: २५ जून, २०२१

प्रति,
माननीय व्यवस्थापक,
सरस्वती शालेय वस्तू भांडार,
किसन नगर क्रमांक १,
ठाणे (प.) - xxxxxx

**विषय:** शालेय वस्तूंची मागणी करण्याबाबत.

महोदय,
मी अ. ब. क., शारदा विद्यालयाचा विद्यार्थी प्रतिनिधी या नात्याने, मा. मुख्याध्यापकांच्या अनुमतीने हे पत्र आपणांस लिहीत आहे. नुकतीच आपली जाहिरात वाचनात आली. आमच्या शाळेला त्यात नमूद केल्याप्रमाणे शालेय व कार्यालयीन उपयोगासाठी काही वस्तू मागवायच्या आहेत. त्याची यादी पुढीलप्रमाणे:

| साहित्य | नग |
|---|---|
| आखीव कागद | ५० डझन |
| चित्रकला कागद | १० डझन |
| पेन (निळे, लाल, काळे) | प्रत्येकी ३ डझन |
| रंगपेट्या | १० डझन |

| साहित्य | नग |
|---|---|
| कार्बन कागद | १ डझन |
| पेन्सिल | २० बॉक्स |
| खडू (पांढरे) | २० बॉक्स |
| रंगीत खडू | ५ बॉक्स |

आपण लवकरात लवकर वरील साहित्य शाळेच्या पत्त्यावर पाठवण्याची व्यवस्था करावी. सोबत सवलतीच्या दराचे बिल जोडावे म्हणजे आपणांस त्या रकमेचा धनादेश पाठवता येईल.

कळावे,

आपला विश्वासू,
अ. ब. क.
विद्यार्थी प्रतिनिधी
शारदा विद्यालय,
कासार वडवली.
ठाणे (प.) - xxxxxx
abc@xyz.com

Sample Content

**किंवा**

२. **तक्रार पत्र**

दिनांक: ३० जून, २०२१

प्रति,
माननीय व्यवस्थापक,
सरस्वती शालेय वस्तू भांडार,
किसन नगर क्रमांक १,
ठाणे (प.) - xxxxxx

**विषय:** मागवलेल्या वस्तूंपैकी गहाळ वस्तूंबाबत.

महोदय,

मी अ. ब. क., शारदा विद्यालयाचा विद्यार्थी प्रतिनिधी या नात्याने मा. मुख्याध्यापकांच्या अनुमतीने हे पत्र आपणांस लिहीत आहे. मागच्या आठवड्यात आम्ही आपल्या दुकानातून काही शालेय वस्तू मागवल्या होत्या. ज्यामध्ये आखीव कागद ५० डझन मागवले होते. प्रत्यक्षात मात्र ३० डझन कागद प्राप्त झाले आहेत. तसेच, रंगपेट्या आपण पाठवलेल्या नाहीत; मात्र बिलामध्ये त्याची नोंद आहे.

आपण त्वरित यामध्ये लक्ष घालून उर्वरित साहित्य पाठवण्याची व्यवस्था करावी, त्यानंतरच आपला धनादेश पाठवणे आम्हांला शक्य होईल.

कळावे,

आपला विश्वासू,
अ. ब. क.
विद्यार्थी प्रतिनिधी
शारदा विद्यालय.
कासार वडवली.
ठाणे (प.) - xxxxxx
abc@xyz.com

Sample Content

**५ खालील निवेदन वाचा व त्याखालील कृती सोडवा.**

**वर्धमान प्रकाशन, अहमदनगर**

खास सवलत
दि. १५ ऑगस्ट
१५% सूट

कथा, कादंबऱ्या, कविता, नाटक, आत्मकथा
सर्व प्रकारची पुस्तके उपलब्ध
विविध विषयांवरची, प्रसिद्ध लेखकांची,
कमी दरात, उत्तम दर्जाची पुस्तके.
vardhamanpublication@gmail.com

ग्रंथालयाचा ग्रंथपाल या नात्याने

**प्रकाशकांकडे पुस्तकांची मागणी करणारे पत्र लिहा.**

**किंवा**

**फाटलेली पुस्तके पुरवल्याबद्दल तक्रार करणारे पत्र लिहा.**

**उत्तर:**

**१. मागणी पत्र**

दिनांक: १० ऑगस्ट, २०२१

प्रति,
माननीय प्रकाशक,
वर्धमान प्रकाशन,
अहमदनगर - xxxxxx

**विषय:** पुस्तकांची मागणी करण्याबाबत.

महोदय,
मी अ. ब. क. 'वाचनप्रेमी ग्रंथालय', अहमदनगर या वाचनालयाचा ग्रंथपाल या नात्याने आपणांस हे पत्र लिहीत आहे. आपण खास सवलतीत पुस्तके उपलब्ध करून देत आहात. त्यामुळे, आमच्या ग्रंथालयाने काही पुस्तके मागवण्याचे ठरवले आहे. पुस्तकांची नावे व लेखक यांची यादी पुढीलप्रमाणे:

| क्र. | पुस्तकाचे नाव | लेखक | प्रती |
|---|---|---|---|
| १. | महानायक | विश्वास पाटील | २ |
| २. | श्रीमान योगी | रणजित देसाई | २ |
| ३. | छावा | शिवाजी सावंत | २ |
| ४. | कोसला | भालचंद्र नेमाडे | १ |

| क्र. | पुस्तकाचे नाव | लेखक | प्रती |
|---|---|---|---|
| ५. | उपरा | लक्ष्मण माने | २ |
| ६. | तो मी नव्हेच | प्र. के. अत्रे | १ |
| ७. | ग्रामगीता | संत तुकडोजी महाराज | १ |

वरील पुस्तके सवलतीच्या दरातील बिलासह लवकरात लवकर ग्रंथालयाच्या पत्त्यावर पाठवण्याची व्यवस्था करावी. आपल्या नावाचा धनादेश पाठवण्याची व्यवस्था आमच्याकडून केली जाईल.

आपला विश्वासू,
अ. ब. क.
वाचनप्रेमी ग्रंथालय,
सरोवर सोसायटी,
सावरखेड, अहमदनगर - xxxxxx
abc@xyz.com

**किंवा**

**२. तक्रार पत्र**

दिनांक: १७ ऑगस्ट, २०२१

प्रति,
माननीय प्रकाशक,
वर्धमान प्रकाशन,
अहमदनगर - xxxxxx

**विषय:** पुस्तकांच्या निकृष्ट दर्जाबाबत.

महोदय,
मी अ. ब. क. 'वाचनप्रेमी ग्रंथालय', अहमदनगर या ग्रंथालयाचा ग्रंथपाल या नात्याने हे पत्र आपणांस लिहीत आहे. आम्ही आमच्या ग्रंथालयासाठी आपल्याकडून काही पुस्तके मागवली होती. आपणांस कळवण्यास खेद होत आहे, की या पुस्तकांमधील काही पुस्तकांची पाने फाटलेली आहेत. छावा या कादंबरीची एक प्रत, तसेच 'उपरा' च्या दोन्ही प्रती अतिशय वाईट अवस्थेत आहेत.

आपण योग्य ती कार्यवाही करून सदर पुस्तकांच्या प्रती बदलून देण्याची व्यवस्था करावी.

Sample Content

कळावे,
आपला विश्वासू,
अ. ब. क.
वाचनप्रेमी ग्रंथालय,
सरोवर सोसायटी,
सावरखेड, अहमदनगर - xxxxxx
abc@gmail.com

**६ खालील निवेदन वाचा व त्याखालील कृती सोडवा.**

**हिरवळ रोपवाटिका**
मुंबई-गोवा महामार्ग, कर्नाळा, पनवेल
जि. रायगड- xxxxxx
सर्व प्रकारची फुलझाडे, फळझाडे तसेच शोभेची रोपे मिळतील.
बागकामाचे साहित्य उपलब्ध

वृक्षारोपणासाठी विशेष सवलतीच्या दराने रोपे उपलब्ध

**संपर्क -** व्यवस्थापक श्री. मोरे: ९८xxxxxxxx
hirval@gmail.com

विद्यार्थी प्रतिनिधी या नात्याने

**शाळेत वृक्षारोपण करण्यासाठी रोपांची मागणी करणारे पत्र लिहा.**

**किंवा**

**मागवलेली रोपे न मिळाल्याबद्दल तक्रार करणारे पत्र लिहा.**

**उत्तर:**

**१. मागणी पत्र**

दिनांक: १ जून, २०२१

प्रति,
श्री. मोरे
माननीय व्यवस्थापक,
हिरवळ रोपवाटिका,
मुंबई-गोवा महामार्ग,
कर्नाळा, पनवेल.
जि. रायगड - xxxxxx

**विषय:** शाळेत वृक्षारोपण करण्यासाठी रोपांची मागणी करण्याबाबत.

महोदय,
मी अ. ब. क., विद्यानिकेतन विद्यालयातील विद्यार्थी प्रतिनिधी या नात्याने मा. मुख्याध्यापकांच्या अनुमतीने हे पत्र आपल्याला लिहीत आहे. ५ जून या दिवशी साजरा होणाऱ्या जागतिक पर्यावरण दिनानिमित्त आमच्या शाळेने शाळेच्या आवारात काही औषधी रोपे व इतर झाडे लावण्याचे ठरवले आहे. आपण आम्हांला खालील यादीप्रमाणे रोपे पाठवण्याची व्यवस्था करावी.

| क्र. | रोपे | नग / संख्या |
|---|---|---|
| १. | तुळस | २५ |
| २. | जास्वंद | २५ |
| ३. | आवळा | ५ |

| क्र. | रोपे | नग / संख्या |
|---|---|---|
| ४. | आंबा | ५ |
| ५. | कोरफड | २० |
| ६. | जांभूळ | ५ |

Sample Content

लवकरात लवकर आपण ही रोपे पाठवण्याची व्यवस्था करावी आणि सोबत सवलतीच्या दराचे बिल पाठवावे ही विनंती. आपल्या बिलाची रक्कम धनादेशाद्वारे देण्याची व्यवस्था करण्यात येईल.

कळावे,

आपला विश्वासू,
अ. ब. क.
विद्यार्थी प्रतिनिधी,
विद्यानिकेतन विद्यालय,
श्रीराम मार्ग, पनवेल - xxxxxx
abc@xyz.com

**किंवा**

२. **तक्रार पत्र**

दिनांक: ६ जून, २०२१

प्रति,
श्री. मोरे
माननीय व्यवस्थापक,
हिरवळ रोपवाटिका,
मुंबई-गोवा महामार्ग,
कर्नाळा, पनवेल.
जि. रायगड - xxxxxx

**विषय:** रोपे उपलब्ध न झाल्याबद्दल.

महोदय,
मी अ. ब. क., विद्यानिकेतन विद्यालयाचा विद्यार्थी प्रतिनिधी या नात्याने मा. मुख्याध्यापकांच्या अनुमतीने हे पत्र आपणांस लिहीत आहे. ५ जून जागतिक पर्यावरण दिनानिमित्त वृक्षारोपण करण्याचे उद्दिष्ट ठेवून आमच्या शाळेने आपल्याकडे काही रोपांची मागणी केली होती; मात्र आम्हांला ही रोपे अजूनही मिळालेली नाहीत. त्यामुळे, कार्यक्रमाचा खोळंबा झाला.

नियोजित कार्यक्रमात बदल करावा लागला. आपल्या व्यवस्थापनातील ही दिरंगाई आमच्या शाळेसाठी त्रासदायक ठरली. तरी अशी दिरंगाई पुन्हा होणार नाही याची काळजी घ्यावी. मागणी केलेली रोपे लवकरात लवकर पोहोच करावीत ही विनंती.

कळावे,

आपला विश्वासू,
अ. ब. क.
विद्यार्थी प्रतिनिधी,
विद्यानिकेतन विद्यालय,
श्रीराम मार्ग, पनवेल, xxxxxx
abc@xyz.com

**७ खालील निवेदन वाचा व त्याखालील कृती सोडवा.**

**परिसरातील कचरापेटीची सफाई होत नसल्याची तक्रार करणारे पत्र महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यास लिहा.**

**किंवा**

**वार्षिक परीक्षेत प्रथम क्रमांक मिळवल्याबद्दल मित्राचे / मैत्रिणीचे पत्राद्वारे अभिनंदन करा.**

Sample Content

उत्तर:

१. **तक्रार पत्र**

दिनांक: २ जुलै २०२१

प्रति,
माननीय कचरा व्यवस्थापन अधिकारी,
बृहन्मुंबई महानगरपालिका,
एम वॉर्ड, चेंबूर (प.)
मुंबई - xxxxxx

**विषय:** परिसरातील कचरापेटीच्या सफाईबाबत.

माननीय महोदय,
मी अ. ब. क., सुमननगर, चेंबूर (पश्चिम) येथील रहिवासी असून या पत्राद्वारे आपले लक्ष आमच्या परिसरातील गंभीर समस्येकडे वेधू इच्छिते. मागच्या महिन्यात आमच्या रहिवासी विभागात नवी कचरापेटी बसवण्यात आली; मात्र त्यातील कचरा वेळेवर उचलला जात नाही. कचरापेटीच्या सफाईकडे वारंवार दुर्लक्ष झाल्याने परिसरात दुर्गंधीचे साम्राज्य पसरले आहे, यामुळे साथीचे आजार पसरण्याची शक्यता वाढली आहे.

आमच्या रहिवासी संघाची ही समस्या आपण जातीने यात लक्ष घालून लवकरात लवकर सोडवाल अशी आशा आम्हांला वाटते.

तसदीबद्दल क्षमा असावी.

आपली विश्वासू,
अ. ब. क.
०५, रामधन सोसायटी,
सुमननगर, चेंबूर (प.),
मुंबई - xxxxxx
abc@gmail.com

**किंवा**

२. **अभिनंदन पत्र**

दिनांक: २० नोव्हेंबर २०२१

प्रिय उमेश,
सप्रेम नमस्कार.

उमेश, कालच काकांची भेट झाली. वार्षिक परीक्षेत तू प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाल्याचे कळले. ऐकून आनंद झाला.

उमेश, लहानपणापासूनच तुझा कल अभ्यासाकडे राहिला आहे. खेळ, कला यांमध्येही चांगली कामगिरी करूनही तू अभ्यासाकडे कधी दुर्लक्ष केले नाहीस. म्हणूनच, तुझ्या या यशाचे आम्हां सर्वांनाच अप्रूप वाटते. परीक्षेत उत्तम गुणांनी उत्तीर्ण होणे एवढेच तुझे उद्दिष्ट नसून अभ्यासातील प्रत्येक संकल्पना समजून घेण्याकडे तुझा कल असतो. तुझ्या याच स्वभावामुळे तू यशाच्या मागे नाही तर यश तुझ्यामागे येते.

भविष्यातही तुझी जिज्ञासू वृत्ती अशीच जागृत ठेव. अभ्यासाकडे लक्ष दे. काका-काकूंना नमस्कार सांग.

तुझा मित्र
अ. ब. क.
२०, व्हिनस अपार्टमेंट,
बी. एन. रोड, घाटकोपर (प.),
मुंबई - xxxxxx
abc@gmail.com

Sample Content

**८ खालील निवेदन वाचा व त्याखालील कृती सोडवा.**

**विद्या स्टेशनरी मार्ट**

**बालदोस्तांसाठी खास सवलत**

- सर्व प्रकारच्या स्टेशनरीवर ४०% सूट
- हस्तकला, चित्रकला, सजावटीचे साहित्य मिळेल.
- शाळेची सर्व प्रकारची वह्या-पुस्तके उपलब्ध
- घाऊक खरेदीवर घरपोच डिलिव्हरी मोफत

पत्ता : विद्या स्टेशनरी मार्ट, अक्षता सदन, एल. बी. एस. मार्ग, मुलुंड (प.), मुंबई - xxxxxx

**शाळेतील हस्तकला कार्यशाळेसाठी हस्तकलेच्या साहित्याची मागणी करणारे पत्र लिहा.**

**किंवा**

**हस्तकला स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक मिळवल्याबद्दल तुमच्या मैत्रिणीचे पत्राद्वारे अभिनंदन करा.**

**उत्तर:**

**१. मागणी पत्र**

दिनांक: ३ ऑगस्ट २०२१

प्रति,
रमाकांत मोदी.
माननीय व्यवस्थापक,
विद्या स्टेशनरी मार्ट,
अक्षता सदन,
एल. बी. एस. मार्ग, मुलुंड (प.)
मुंबई - xxxxxx

**विषय:** हस्तकलेच्या साहित्याची मागणी करण्यासंदर्भात.

माननीय महोदय,
मी अ. ब. क., शारदा विद्यामंदिर, मुलुंड (पू.) मध्ये नववी इयत्तेत शिकणारा विद्यार्थी असून शाळेचा विद्यार्थी प्रतिनिधी या नात्याने कलाविभाग प्रमुखांच्या संमतीने हे पत्र लिहीत आहे. आमच्या शाळेत ११ ऑगस्ट रोजी हस्तकला कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यशाळेकरता आम्हांला हस्तकलेच्या काही साहित्याची आवश्यकता आहे. आवश्यक साहित्याची यादी पुढे जोडत आहे.

| क्र. | वस्तू | नग |
|---|---|---|
| १. | लोकर | १० |
| २. | क्रोशाच्या सुया | २० |
| ३. | मणी | १०० |

| क्र. | वस्तू | नग |
|---|---|---|
| ४. | रंगीत कागद | २०० |
| ५. | फेव्हिकॉल | ५ |
| ६. | रंग | १० |

कृपया, वरील सर्व साहित्य शाळेच्या पत्त्यावर पाठवून द्यावे व सोबत बिलही जोडावे. जेणेकरून बिलाचे पैसे धनादेशाद्वारे त्वरित देता येतील. या खरेदीवर आपण योग्य ती सवलत द्याल असा विश्वास वाटतो. सदर साहित्य लवकरात लवकर पोहोच करावे ही विनंती.

आपला विश्वासू,
अ. ब. क.
शारदा विद्यामंदिर,
सतेज सिंग मार्ग, मुलुंड (पू.)
मुंबई - xxxxxx
abc@gmail.com

**किंवा**

**२. अभिनंदन पत्र**

दिनांक: १२ ऑगस्ट २०२१

प्रिय रश्मी,

सप्रेम नमस्कार
रश्मी, हस्तकला स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवल्याबद्दल सर्वप्रथम तुझे खूप खूप अभिनंदन! रश्मी लहानपणापासून तुला हस्तकलेत रस आहे हे आम्हां साऱ्यांनाच ठाऊक आहे. अभ्यासातून मिळणाऱ्या मोकळ्या वेळेत तू सतत काहीनाकाही करतच असतेस. टाकाऊ वस्तूंपासून हस्तकलेच्या सुंदर वस्तू तयार करण्यात नेहमीच तुझा हातखंडा राहिला आहे. हस्तकला स्पर्धेत तुला मिळालेले हे पारितोषिक म्हणजे तुझ्यातील कौशल्याला, तुझ्यात दडलेल्या कलाकाराला मिळालेली दाद आहे.

तुझ्या या आवडीला प्रशिक्षणाची जोड मिळाली, तर तुझ्यातील कला अधिक खुलून येईल. भविष्यात तू यासाठी प्रयत्नशील राहशील असा विश्वास मला वाटतो. पुन्हा एकवार तुझे अभिनंदन!

तुझी सखी,
अ. ब. क.
०४, स्टार पॅराडाईज सोसायटी,
ओमकार नगर, भांडुप (प.)
मुंबई - xxxxxx
abc@gmail.com

## सराव कृती

**१ खालील निवेदन वाचा आणि सूचनेनुसार कृती करा.**

**"स्वच्छ परिसर - स्वच्छ देश"**
आपला परिसर स्वच्छ ठेवण्यासाठी मोफत कचराकुंडी मिळवा
विभागीय अधिकारी
महानगरपालिका ठाणे
tmcthane@gmail.com

सोसायटीचा सचिव या नात्याने

**सोसायटीसाठी दोन कचराकुंड्या देण्याविषयी मागणी करणारे पत्र लिहा.**

**किंवा**

**महानगरपालिकेची घंटागाडी वेळेवर येत नसल्याची तक्रार करणारे पत्र लिहा.**

Sample Content

२

**महाराष्ट्र राज्य विद्युत महामंडळ**
श्री. सचिन यादव
(मुख्य अधीक्षक)
मुख्य कार्यालय: २०३/अ, राधाकृष्ण नगर, स्टेशन रोड, डोंबिवली (पू.) xxxxxx

ग्राहक या नात्याने

**नवीन मीटर बसवण्याची मागणी करणारे पत्र लिहा.**

**किंवा**

**विद्युत सेवा वारंवार खंडित होत असल्याची तक्रार करणारे पत्र लिहा.**

३

**'कुतूहल' शैक्षणिक साहित्य भांडार**
विद्यार्थ्यांमध्ये कुतूहल जागवणे, हेच आमचे ध्येय

**आमची वैशिष्ट्ये**

- वैविध्यपूर्ण शैक्षणिक साहित्य उपलब्ध
- नाविन्यपूर्ण संकल्पनांचा वापर
- पर्यावरणपूरक साधनांचा वापर
- ऑनलाईन ऑर्डर
- घरपोच सेवा
- शिशू वर्गापासून १० वी इयत्तेसाठी शैक्षणिक साधने उपलब्ध

रु. ५००
खरेदीवर २०%
सूट

**पत्ता:** ०१, गोदावरी निवास, संबळपूर, पुणे - xxxxxx
**मोबाईल क्र:** xxxxxxxxxx

**१ ली ते ८ वी च्या विद्यार्थ्यांकरता शैक्षणिक साहित्याची मागणी करणारे पत्र लिहा.**

**किंवा**

**आपल्या बहिणीच्या शैक्षणिक साहित्याच्या दुकानाच्या संकल्पनेच्या यशाबद्दल तिचे अभिनंदन करणारे पत्र लिहा.**

Sample Content

# AVAILABLE NOTES FOR STD. IX:

**Eng. Med.**
- English Kumarbharati
- मराठी अक्षरभारती
- हिंदी लोकभारती
- हिंदी लोकवाणी
- आमोद: सम्पूर्ण-संस्कृतम्
- आनन्द: संयुक्त-संस्कृतम्
- History and Political Science
- Geography
- Mathematics (Part - I)
- Mathematics (Part - II)
- Science and Technology

**Mar. Med.**
- My English Coursebook
- मराठी कुमारभारती
- हिंदी लोकभारती
- हिंदी लोकवाणी
- आमोद: सम्पूर्ण-संस्कृतम्
- आनन्द: संयुक्त-संस्कृतम्
- इतिहास व राज्यशास्त्र
- भूगोल
- गणित (भाग - I)
- गणित (भाग - II)
- विज्ञान आणि तंत्रज्ञान

**Additional Titles:**

Grammar & Writing Skills Books (Std. IX & X)
- Marathi
- Hindi
- English

# AVAILABLE NOTES FOR STD. X:

**Eng. Med.**

PERFECT SERIES
- English Kumarbharati
- मराठी अक्षरभारती
- हिंदी लोकभारती
- हिंदी लोकवाणी
- आमोद: सम्पूर्ण-संस्कृतम्
- आनन्द: संयुक्त-संस्कृतम्
- History and Political Science
- Geography
- Mathematics (Part - I)
- Mathematics (Part - II)
- Science and Technology (Part - 1)
- Science and Technology (Part - 2)

**Eng. Med.**

PRECISE SERIES
- English Kumarbharati
- मराठी अक्षरभारती
- हिंदी लोकभारती
- History, Political Science and Geography
- Science and Technology (Part - 1)
- Science and Technology (Part - 2)

**Mar. Med.**

PRECISE SERIES
- My English Coursebook
- मराठी कुमारभारती
- हिंदी लोकभारती
- हिंदी लोकवाणी
- आमोद: सम्पूर्ण-संस्कृतम्
- आनन्द: संयुक्त-संस्कृतम्
- इतिहास व राज्यशास्त्र
- भूगोल
- गणित (भाग - I)
- गणित (भाग - II)
- विज्ञान आणि तंत्रज्ञान (भाग - १)
- विज्ञान आणि तंत्रज्ञान (भाग - २)

## OUR PRODUCT RANGE

Children Books | School Section | Junior College

Degree College | Entrance Exams | Statponery




Explore our range of STATIONERY

Target Publications® Pvt. Ltd.

**Address:**
2nd floor, Aroto Industrial Premises CHS,
Above Surya Eye Hospital, 63-A, P. K. Road,
Mulund (W), Mumbai 400 080

**Tel:** 88799 39712 / 13 / 14 / 15
**Website:** www.targetpublications.org
**Email:** mail@targetpublications.org

Visit Our Website